Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# महाराष्ट्र राज्यातील पाणी उपलब्धतेची स्थिती आणि संघर्षाची मुद्दे

**सुदर्शन विलास कावळे**
(पीएच.डी)
डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**डॉ. नितीन हरीदास गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रस्तावना :**

जगातील विविध देशांमध्ये त्यांच्या स्थानानुसार तेथील भौगोलिक परिस्थिती, तापमान, हवामान व पर्जन्यामान अवलंबून असते. काही देशांना नैसर्गिक देणगी म्हणून भौगोलिक परीस्थिती उत्तम लाभलेली आहे. जसे भरपूर पाऊस (सरासरी १००० मी. मी. पेक्षा जास्त) १०$^{\circ}$ ते ३०$^{\circ}$ सेल्सियस दरम्यान तापमान, समुद्र किनारा अशी अनेक उदाहरणे आहेत. अशा उत्तम परिस्थिती मुळे मानव विकासाला चालना मिळते या उलट अनेक देशांमध्ये उत्तम नैसर्गिक साधनसंपत्तीचा अभाव बघायला मिळते. उदा. वाळवंटी प्रदेश अत्यल्प पाऊस, अत्यल्प भुजल, अत्यल्प खनिज संपत्ती, भुकंप प्रवण प्रदेश अशी अनेक संकटे असतात. त्यामुळे अशी भौगोलिक स्थिती मानव विकासाला अडचणीच्या ठरतांना दिसून येते.

भारत हा जैवविविधतेने नटलेला देश आहे. भारताच्या उत्तरेला हिमालय पर्वत रांगा, पूर्वेला बंगालचा उपसागर, दक्षिणेला हिंद महासागर तर पश्चिमेला अरब सागर आहे. संपूर्ण भारताला ७५१६.६ कि.मी. लांबीचा विस्तीर्ण समुद्र किनारा लाभलेला आहे. द्विपकल्प भारतात महाराष्ट्राच्या जलसंपत्तीला महत्वाचे स्थान आहे. महाराष्ट्र दख्खन पठाराचा एक भाग आहे. भौगोलिक, ऐतिहासिक आणि आर्थिक दृष्टीने महाराष्ट्राचे एक वेगळेच स्थान आहे. महाराष्ट्र प्राचीन मगध, सातवाहन काळापासून ते आजपर्यंत राजकीय दृष्ट्या जागृत आहे.

राज्यातील बहुतांश जनतेचे जीवन कृषी उत्पादन आणि कृषी उघोगाला येथील अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान आहे. महाराष्ट्र हा भारतातील एक प्रगत राज्य म्हणून ओळखले जात आहे. परंतु येथे विविध गंभीर समस्या व आव्हाने कायम दिसून येतात. राज्यातील सिंचन श्रेत्र पुर्णपणे नैसर्गिक पाऊसावर व येथील भुजलावर अवलंबून आहे. भारतात जागातील जवळपास १८ टक्के लोकसंख्या आणि ४ टक्के गोड्या पाण्याचा पुरवठा अशी पाण्याच्या उपलब्धतेची स्थिती आहे. भारतापेक्षा लोकसंख्येने आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठा असलेल्या चीन या देशामध्ये त्यातील गोड्या पाण्याचे व टक्के प्रमाण आहे. म्हणजे

पाण्याच्या उपलब्धतेच्या संदर्भात चीनची स्थिती भारतापेक्षा चांगली आहे. भारतात पाण्याची

उपलब्धता फारच कमी आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातील पाण्याची उपलब्धता विषम प्रमाणात आहे. राज्यातील मोठा भूभाग हा अवर्षण प्रवण आहे. त्या क्षेत्रात नेहमी टंचाईग्रस्त स्थिती असल्याचे निदर्शनास येते. तर दुसरीकडे काही भुभागावर पाण्याची उपलब्धता विपूल प्रमाणात आहे. राज्यातील पर्जन्यमान विषमप्रमाणात आहे. जागतिक तापमान वाढ व हवामान बदलामुळे परिस्थिती अधिकच बिकट होत चालली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई पाण्याची उपलब्धता कमी होत चालली आहे. तसेच वाढते शहरीकरण औद्योगिकीकरण व बदलत्या जीवनशैलीमुळे पाणी व्यवस्थापने वरील वाढत चालला आहे. परिणामी पाणी व्यवस्थापन एक प्रमुख आव्हान झाले आहे.

**महाराष्ट्रातील पाण्याची उपलब्धती :-**

भारतीय द्विपकल्पाचा महत्वाचा भाग असलेल्या महाराष्ट्र राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.७० लाख हेक्टर इतके असून त्यापैकी सुमारे २२५.४० लाख हेक्टर लागवडी योग्य क्षेत्र आहे. राज्याचे भौगोलिक क्षेत्र प्रामुख्याने कोकण नदी खोरे, गोदावरी, कृष्णा, तापी व नर्मदा खोऱ्यात व त्यांच्या उपखोऱ्यात विभागलेले आहेत.

**(राज्यातील प्रदेशनिहाय पाण्याची उपलब्धता ( दरडोई दर हेक्टर )**

| **प्रदेश** | **लागवडी योग्य लाभ क्षेत्र (लाख हेक्टर)** | **लोकसंख्या** | **न्यायाधिकरणानुसार पाण्याची उपलब्धता (द.ल.घ.मी)** | **पाण्याची उपलब्धता दरडोई घ.मी हेक्टर स्तंभ ४/३** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| मराठवाडा | ५९.३ | १,८७,२७,७४८ | ८२०२ | ४३८ |
| विदर्भ | ६२.५ | २,३०,०३,९७९ | २२६५५ | ९८५ |
| उर्वरीत महाराष्ट्र | १०३.७ | ७,०६,४२,०४५ | ९५०७९ | १३४६ |
| **एकूण महाराष्ट्र** | **२२५.४** | **११,२३,७२,९७२** | **१,२५,९३६** | **११२१** |

राज्याच्या सर्व नदी खोऱ्यातील एकूण उपलब्ध १,६३,८२० द.ल.घ.मी एवढे असून न्यायधिकरणाच्या निर्णयानुसार ७५ टक्के विश्वासहर्तेने १,२५,९३६ द.ल.घ.मी एवढे मर्यादीत पाणी राज्याला वापरण्यासाठी मुभा दिलेली आहे. त्यापैकी सर्वात कमी पाणी मराठवाड्याला केवळ ८२०२ द.ल.घ.मी एवढे वापरण्यासाठी उपलब्ध झालेले आहे. मराठवाड्याला आवश्यकतेपेक्षा खुपच कमी पाणी मिळालेले आहे. न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार उपलब्ध पाण्यापैकी विदर्भाला २२६५५ द.ल.घ.मी एवढे पाणी उपयोगात आणण्याची मुभा आहे. विदर्भाची पाण्यासंदर्भातील स्थिती मराठवाड्यापेक्षा चांगली दिसते. तसेच न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार उपलब्ध पाण्यापैकी सर्वाधिक पाणी उर्वरीत महाराष्ट्राला ९५०७९ द.ल.घ.मी एवढे प्रचंड वापरण्यास मुभा आहे. अशा प्रकारे एकंदरीत राज्यातील प्रदेशनिहाय पाणी उपलब्धतेची स्थिती दिसून येते.

महाराष्ट्रातील बराचसा भूभाग हा अवर्षण प्रवण क्षेत्रात येतो. त्यामुळे तेथे नेहमी दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण होते. ह्या परिस्थित राज्याला आर्थिक संकटाचा सामना करावा लागतो. अवर्षण व दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे होणाऱ्या प्रचंड नुकसानावर एकमेव उपाय म्हणजे जलसिंचनामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करणे. महाराष्ट्रात पर्जन्यमान विषमतेचे आहेत. राज्याचे सरासरी पर्जन्यमान १३६० मी.ली. एवढे आहे. महाराष्ट्राच्या विविध प्रदेशातील पावसाची उपलब्धता व त्यावरील अवंलबिता यात खुपच तफावत आहे. कोकणात सरासरी २००० ते ३५०० मी. मी. इतका पाऊस पडतो. सह्याद्रीच्या पुर्वेकडील पर्जन्यछायेच्या प्रदेशात ४५० मि.मी. इतका पाऊस पडतो. मराठवाड्यात सरासरी ८२५ मि.मी तर विदर्भात सरासरी १११० मी. मी. इतका पाऊस पडतो महाराष्ट्र राज्याने सिंचनासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केलेली आहेत. शासनाच्या या नियोजना संबंधी धोरणाचा निश्चित उपयोग झाला आहे. परंतु बदलत्या काळात या यंत्रणा अपूऱ्या पडताना दिसतात. त्यामुळे राज्यात पाण्यासाठी संघर्ष व राजकारण बघायला मिळते.

महाराष्ट्र राज्यातुन उगम पावणाऱ्या गोदावरी व कृष्णा नदीच्या पाणी वाटपावरून शेजारील राज्यांशी नेहमी संघर्ष बघायला मिळतो. १९६० च्या दरम्यान गोदावरी-कृष्णा पाणी वाटप परिषदेमुळे सर्वच संबंधित राज्यामध्ये राजकारणाला तोंड फुटले. वादविवाद मिटविण्यासाठी तत्कालीन केंद्र सरकारने श्री. एम. डी. गुलाटी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली या समितीने गोदावरीचे ज्यादा पाणी आंधप्रदेश राज्यासाठी व कृष्णा खोऱ्यात वापरता यावे असे सुचविले. ह्यामुळे पाणी वाटपाचा मुद्दा मिटला गेला नाही. कृष्णा नदी खोऱ्यात पाण्याचा आंध्रपदेश व कर्नाटक राज्याला अधिक प्रमाणात फायदा वादविवाद मिटविण्याकरीता भारतीय संसदेत आंतरराष्ट्रीय नदी जल-विवाद कायदा १९५६ पारित केला आहे. तो सर्व राज्यांना लवादासाठी लागू आहे. तसेच आंतरराष्ट्रीय नद्या आणि नद्यांचे खोरे विकास व एकात्मिकरणासाठी संसदेने रिव्हर बोर्ड ॲक्ट १९५६ पारित केला आहे.

कृष्णा खोऱ्यातील उपलब्ध पाणी समन्यायी तत्वावर संबंधित राज्यांना देण्यात यावे याकरीता महाराष्ट्र राज्याने केंद्रसरकारकडे लवादाची मागणी केली होती. त्यावर केंद्र सरकारने १९६९ मध्ये न्या. आर.एम. बच्छावत यांच्या अध्यक्षतेखाली लवाद नेमला. या लवादाने १९७६ मध्ये ७५ टक्के विश्वासदर्तेने पाणी वाटपाचा निर्णय दिला. कृष्णा खोऱ्यातील एकूण २१३० अ.घ.फु पाण्यापैकी महाराष्ट्राला ५८५ अ.घ.फु पाणी वाट्याला आले. कर्नाटकाला ७३४ अ.घ.फु आणि आंध्रप्रदेशाला ८११ अ.घ.फु पाणी वाट्याला आले. या तीन राज्याला ३१ मे २००० पर्यत आपल्या वाट्याला आलेले पाणी अडवून त्याचा वापर करण्याची अट लवादाने घातली होती. त्या अटीची पुर्तता आंध्रप्रदेश, कर्नाटकाने केली मात्र महाराष्ट्राला पाण्याचा पुर्णपणे उपयोग करण्यात यश आले नाही. ह्या लवादाच्या निर्णयामध्ये मे २००० नंतर पाणीवाटप पुर्नविलोकनाची

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

तरतुद होती त्यामुळे कृष्णा पाणी वाटपाचा प्रश्न पुन्हा चर्चेला आला. शेवटी केंद्रसरकारने श्री ब्रजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली २००४ ला पुन्हा लवाद नेमला. दुसऱ्या लवादाने महाराष्ट्राला ६६० अ.घ.फु पाणी वाट्याला दिले गोदावरी खोऱ्यातील पाण्याचे वाटप करण्यासाठी केंद्र सरकारने १० एप्रिल १९६९ रोजी लवादाची स्थापना केली. या लवादाने आपला निवाडा जुलै १९८० ला सरकारी राजपत्रात जाहीर केला. या लवादाने राज्यातील गोदावरी खोऱ्यातील ७५ टक्के विश्वासहर्तेने पाण्याची एकूण उपलब्धता १३३६ अ.घ.फु काढली असून त्यापैकी महाराष्ट्राला १०८९ अ.घ.फु. उपयोगात आणण्यास मुभा दिली. गोदावरी नदी खोऱ्याचे ४८ टक्के पाणलोट क्षेत्र महाराष्ट्रमध्ये येते. नर्मदा खोऱ्यातील पाणी संदर्भात गुजरात, महाराष्ट्र , मध्यप्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये पाणी वाटपातून संघर्ष होताना दिसत. ह्या राज्यातील पाण्याचा संघर्ष मिटविण्यातही न्या.वी. रामास्वामी यांच्या अध्यक्षतेखाली ६ ऑक्टोबर १९६९ रोजी नर्मदा लवादाची स्थापना केली. भारत सरकारने पुढे १२ डिसेंबर १९७९ ला लवादाचा निर्णय राजपत्रात जाहीर केला. या लवादाने ७५ टक्के विश्वासहर्तेने या लाभांकित चार राज्यापैकी खोऱ्यातील एकूण उपलब्ध २८ मिलियन एकर फुट पाण्यापैकी महाराष्ट्राला केवळ ०.२५ मिलियन एकर फुट पाणी वापरासाठी मुभा दिली.

मराठवाड्यात सतत पडणाऱ्या दुष्काळावर कायम स्वरूपी उपाययोजना करण्याची २०१६-१७ मध्ये तत्कालीन राज्य सरकारने टँकरमुक्त व टंचाईमुक्त मराठवाडा या मोहिमे अंतर्गत कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प मार्गी लावण्यासाठी २५० कोटींची विशेष तरतुद अर्थसंकल्पात केली होती. कृष्णा खोऱ्यातील ०७ टि.एम.सी पाणी मराठवाड्याला मिळण्यास मंत्रिमंडळाने जाहिर केले. परंतु स्थानिक नेत्यांच्या विरोधामुळे व त्यांच्या राजकारणामुळे कृष्णा खोऱ्यातील ०७ टि.एम.सी पाणी मराठवाड्याला अजून तरी मिळालेले नाही. अशा प्रकारच्या राजकारणामुळे अवर्षण प्रवण असणाऱ्या मराठवाड्याच्या हिताला मोठा धक्का बसतो.

कृष्णा-भिमा स्थिरिकरण प्रकल्पातंर्गत कृष्णा खोऱ्यातील २१ टि.एम.सी पाणी मराठवाड्याला देण्यासाठी औरंगाबाद येथे सप्टेंबर २००६ ला झालेल्या तत्कालीन मंत्रिमंडळाच्या बैठकीत २५७३ कोटी रूपयांचा योजनेचा आराखडा मंजूरीसाठी ठेवण्यात आला होता. परंतु तत्कालीन मंत्रिमंडळात आलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी या योजनांच्या आराखडाला विरोध केल्याने या प्रस्तावावर निर्णय घेतले गेले नाही. परंतु नंतर च्या बैठकीमध्ये ८७१ कोटींच्या आराखड्याला मंजूरी देण्यात आली. ह्या योजनांमुळे उस्मानाबाद व बीड जिल्ह्यांना पाणी पुरवठा होणार आहे. परंतु निधी अभावी तीन टप्प्यांत पुर्णत्वास जाणारे प्रकल्प अनुजनही रखडलेले आहेत. याचा सरळ अर्थ निघतो की पश्चिम महाराष्ट्रातील राजकारणाने कृष्णा-भिमा स्थिरीकरणामुळे मराठवाड्याला मिळणाऱ्या २१ टि.एम.सी पाणी पुणे विभागाला तेवढी आवश्यकता नसतांनाही अधिकचे वापरले जाते.

**निष्कर्ष :-**

१. महाराष्ट्रातील प्रदेशनिहाय पाण्याची उपलब्धता खुप तफावतीची दिसून येते.

२. न्यायाधिकरणाने उपलब्ध करून दिलेले पाणी समप्रमाणात दिसून येत नाही.

३. मराठवाडयातील पर्जन्यमान सरासरी कमी असून येथील बराचसा भुभाग अवर्षण प्रवण आहे. त्यामुळे येथे नेहमी टंचाईग्रस्त स्थिती उद्‌भवते.

४. लवादाच्या निर्णयानुसार उपलब्ध करून दिलेल्या पाण्याचा पुर्णपणे उपयोग महाराष्ट्राला करता आला नाही.

५. राज्यात स्थानिक राजकारणामुळे बरेचसे सिंचन प्रकल्प पुर्ण झाले नाही. व विरोध असल्याने योजनांचा भंग झालेला दिसून येतो.

**संदर्भ :-**

१. चितळे, माधव (१९९९). महाराष्ट्र जल व सिंचन अहवाल : महाराष्ट्र शासन

२. डॉ. केळकर, विजय (२०१३). महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल. महाराष्ट्र शासन.

३. थोरात, सुखदेव. (२०१६) बाबासाहेब आंबेडकर : नियोजन, जल व विद्युत विकासा- भुमिका व योगदान पुणे : लोकवाडम गृह.

४. जाधव, या.रा. (२०१०) महाराष्ट्रातील पाण्याचे नियोजन आणि सिंचन विकास. औरंगाबाद : सुवर्ण महोत्सव सिंहावलोकन परिषद व संशोधन प्रकल्प.

५. गायकवाड, दत्तात्रय. (२०१५) बहुउद्देशीय नदी खोरे विकास आणि डॉ. आंबेडकरांची जलनीती. पुणे : स्वयंदीप प्रकाशन

६. तेजनकर, अशोक, (२०१९). महाराष्ट्रातील पाणी प्रश्न आणि जलसाक्षरता, औरंगाबाद : चिन्मय प्रकाशन

७. पाध्ये रमेश. आणि नाटकर, अमित. (२०१८). महाराष्ट्रातील पाण्याचा प्रश्न एक शोधयात्रा, पुणे : युनिक ॲकडमी पब्लीकेशन्स.

८. Report of the narmada water Disputes Tribunal (1979) new Delhi : Government of India